**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला**
मुर्तीजापूर रोड, गेट क्र. ८, जुना जकात नाका, कृषिनगर, अकोला – ४४४१०४
(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

## वृक्षांचा सीलबंद द्वि-लिफाफा पद्धतीने लिलाव

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला च्या परीसरातील अत्यावश्यक बांधकामात अडथळा होत असल्याने निवडक झाडे तोडण्यास, काढून टाकण्यास व नियमानुसार योग्य विल्हेवाट लावण्यासाठी 'सीलबंद द्वि-लिफाफा पद्धतीने' लिलाव आयोजित करण्यात येत आहे. याबाबत मंगळवार, दिनांक ०७.१०.२०२५ च्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत सीलबंद लिफाफे स्वीकारल्या जातील. गुरुवार, दिनांक ०९.१०.२०२५ रोजी सकाळी ११ वाजता सदर सीलबंद लिफाफे उघडण्यात येतील.

लिलावाच्या अटी व शर्ती महाविद्यालयाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत तसेच महाविद्यालयाच्या **https://covasaklmafsu.ac.in** या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

दि. : २६.०९.२०२५

जा. क्र.: १२९८/२०२५

O/c. 26.9.25

सहयोगी अधिष्ठाता

# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला

## पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला परीसरातील वृक्षांचा बंद द्वि-लिफाफा पद्धतीने लिलाव

## <u>अटी व शर्ती</u>

१] लिलाव करावयाची ८६ झाडे ही कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:०० च्या दरम्यान प्रत्यक्ष पाहता येतील. गरज वाटल्यास त्यासाठी मालमत्ता अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

२] कंत्राटदार / बोलीदार यांनी लिफाफा क्र. १ मध्ये आधार कार्ड, पन कार्डच्या छायांकित प्रती व इतर दस्तावेजासोबतच अनामत रक्कम रु. ५०००/- चा धनाकर्ष (डीडी) सहयोगी अधिष्ठाता, पीजीआयव्हीएएस, अकोला (Associate Dean, PGIVAS, Akola) यांचे नावे व सोबत विहित नमुन्यातील भरलेले हमीपत्र जोडणे बंधनकारक राहील.

३] लिलावाची अधिकतम बोलीची अंतिम रक्कम लिफाफा क्र. २ मधील प्रपत्र क्र. २ मध्ये नमूद करून सदर लिफाफा सीलबंद करावा.

४] <u>लिफाफा क्र. १ व २ वर संबंधित लिफाफ्याचा क्रमांक ठळकपणे नमूद करून अधोरेखित करावा</u> व सदर दोन्ही लिफाफे स्वतंत्रपणे सीलबंद करून एका मोठ्या लिफाफ्यात टाकून सदर मोठा लिफाफा सीलबंद करून सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांच्या कार्यालयात जमा करावा.

५] यशस्वी बोलीदाराची अनामत रक्कम स्विकारलेल्या रकमेसोबत समायोजित केली जाईल. ईतर अयशस्वी बोलीदारांची अनामत रक्कम लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

६] यशस्वी बोलीदाराला अंतिम यशस्वी बोलीची पूर्ण रक्कम २ दिवसांत (दि. १०.१०.२०२५ रोजी उशिरात उशिरा दुपारनंतर ४ वाजण्यापूर्वी) धनाकर्ष (डीडी) स्वरूपात किंवा आरटीजीएस (RTGS) द्वारे भरावी लागेल व न भरल्यास यशस्वी बोली रद्द केल्या जाऊ शकते व अशा परीस्थितीत सदर बोलीदारास वृक्ष तोड परवानगी दिली जाणार नाही.

७] लिलावाबावत कोणताही वाद उद्भवल्यास लिलाव समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

८] सर्वोच्च बोलीदार बोलीची १००% रक्कम आणि किंमतीनुसार सर्व संबंधित कर (लागू असलेले) जमा केल्यानंतर १० दिवसांचे आत लिलावातील संपूर्ण वृक्ष जमीन पातळीपर्यंत तोड करून त्याची संपूर्ण उचल करून महाविद्यालयाबाहेर नेतील. असे न केल्यास १० दिवसांची मुदत संपल्यानंतर प्रतिदिन रु. २०००/- इतका दंड आकारून तो महाविद्यालयाच्या खजिन्यात जमा केला जाईल. अशा बाबतीत दंड न भरल्यास नियमानुसार योग्य कारवाई / कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांचेकडे राखीव असतील.

९] उपरोक्त मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद केलेली रक्कम जमा केल्यानंतर लिलावातील उभी झाडे, तोडलेली झाडे, फांद्या, इत्यादीच्या देखरेखीची, सुरक्षेची पूर्ण जवाबदारी ही यशस्वी बोलीदाराची असेल, याची नोंद घ्यावी. या मालाचे नुकसान, तोटा, चोरी, इत्यादीसाठी हे महाविद्यालय जवाबदार राहणार नाही.

१०] तोडलेली झाडे, फांद्या, इत्यादीच्या विल्हेवाटीची व्यवस्था यशस्वी बोलीदारास स्वखर्चाने करावी लागेल.

११] तोडलेली झाडे, फांद्या, इत्यादीच्या उचल करण्याची वाहतुकीची शासकीय नियमानुसार व्यवस्था, वन विभागाची परवानगी, वन विभागाच्या / संबंधित शासकीय यंत्रणेच्या वाहतूक पास (TP) ची व्यवस्था यशस्वी बोलीदारास स्वखर्चाने करावी लागेल. वाहतुकीस वापरण्यात येणारे वाहन हे आरटीओच्या नियमावलीनुसार पूर्णपणे वैध असावे.

१२] वृक्ष तोड करणे, तोडलेली झाडे, फांद्या, इत्यादीची उचल, वाहतूक, विल्हेवाट, इत्यादी दरम्यान बाल मजूर वापर केल्या जाणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच वरील नमूद सर्व कामे करतांना कोणतीही व्यक्ती, कामगार यांच्या जीविताची हानी त्याचप्रमाणे जैविक-अजैविक बाबींचे नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी यशस्वी बोलीदार जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

१३] यशस्वी बोली रक्कम कार्यालयात जमा करण्यासाठी स्विकारल्यानंतर तसेच वृक्ष तोड करणे, तोडलेली झाडे, फांद्या, इत्यादीची उचल, वाहतूक, केल्यानंतर कोणतीही तक्रार ग्राह्य धरल्या जाणार नाही.

१४] अपवादात्मक परीस्थितीत विद्यापीठाच्या हितार्थ त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये ऐनवेळी अटी व शर्ती शिथिल करण्याचे, अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.

१५] लिलावाच्या प्रक्रीयेदरम्यान कोणतीही अडचण आल्यास या संबंधी कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहील.

१६] लिलाव प्रक्रिया पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहील.

१७] लिलाव / निविदा प्रक्रीयेसंदर्भाने वाद उद्भवल्यास सदरहू बाब अकोला न्यायालायाच्या अधिकार क्षेत्रात असेल.

१८] वृक्ष, वृक्षाच्या फांद्या तोडण्याच्या पुरेशा आधी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला आपले स्तरावरून सूचना द्यावी लागेल जेणेकरून वृक्ष तोडीस बाधा येणार नाही तसेच महाविद्यालयात विद्युत पुरवठा सुरळीत राहील.

लिफाफा क्र. १ मध्ये समाविष्ट कागदपत्रे :

अ. आधार कार्ड

आ. पन कार्ड

इ. रु. ५०००/- रकमेचा धनाकर्ष

ई. हमीपत्र (प्रपत्र क्र. १)

लिफाफा क्र. २ मध्ये समाविष्ट कागदपत्रे :

अ. लिलावाच्या दराचे प्रपत्र (प्रपत्र क्र. २)

# <u>प्रपत्र क्र. १ (हमीपत्र)</u>

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या परीसरातील अत्यावश्यक बांधकामात अडथळा होत असल्याने निवडक झाडे तोडण्यास, काढून टाकण्यास व नियमानुसार योग्य विल्हेवाट लावण्यासाठी वृक्षांचा 'सीलबंद द्वि-लिफाफा पद्धतीने' आयोजित लिलावाची जाहिरात क्र. १२९८/२०२५ दिनांक २६.०९.२०२५ मध्ये मी निम्नस्वाक्षरीकार नामे --------- ------------------------------------------------ रा. ------------------------------------------------------ -------------------------- बोलीदार म्हणून सहभागी होण्यास इच्छुक असून सदर लिलाव प्रक्रियेतील सर्व अटी व शर्ती ह्या मी वाचून व समजून घेतलेल्या असून त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी स्वतः संबंधीत तोडावयाच्या झाडांची पुर्णपणे पाहणी करून खातरजमा केल्यानंतरच सदर दर सादर करीत आहे. माझे दर मान्य झाल्यास, बोलीची रक्कम व त्याबाबतचे सर्व कर (लागू असल्यास) विहित वेळेत भरणा करण्याची सर्व जबाबदारी ही माझी असेल. तोडलेल्या वृक्षांची वाहतूक करताना शासकीय नियमानुसार पात्र अशा वाहनानेच व योग्य शासकीय यंत्रणेकडून प्राप्त वैध वाहतूक पास धारण करून वाहतूक करण्याची मी हमी देत आहे. त्याबाबत कुठलीही अडचण उद्भवल्यास संपूर्ण जबाबदारी ही माझी असेल.

लिलाव आयोजित करणाऱ्या कार्यालयाशी माझे कुठलेही हितसंबंध नाही व सदर प्रक्रियेत मी फक्त एकच बोलीपत्र सादर केल्याची हमी देत आहे.

बोलीदाराची स्वाक्षरी

नाव : ---------------------------------

पत्ता: ---------------------------------

# <u>प्रपत्र क्र. २ (बोलीपत्र)</u>

**मा. सहयोगी अधिष्ठाता,**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला

विषय : वृक्षांच्या लिलावाचे बोलीपत्र सादर करणेबाबत

संदर्भ : आपल्या कार्यालयाची जाहिरात क्रमांक १२९८/२०२५ दिनांक २६.०९.२०२५

मा. महोदय,

मी निम्नस्वाक्षरीकार संदर्भांकित जाहिरातीला अनुसरून खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे:

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| ०१. | पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला च्या परीसरातील फक्त लिलावासाठी निवडलेली झाडे कार्यालयाने विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून तोडणे व महाविद्यालय परीसरातून योग्य पद्धतीने ते काढून टाकणे / विल्हेवाट लावणे / उचल व वाहतूक करणे (एकूण ८६ झाडे). | |

उपरोक्त दर हे महाविद्यालय परीसरातील लिलावासाठी निवडलेल्या ८६ झाडांची मी स्वतः प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर सादर करीत आहे.

बोलीदाराची स्वाक्षरी

नाव : --------------------------------------------------

पत्ता: ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

संपर्क क्रमांक :